# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र २०८ / २०२६

**विषय : विद्यापीठ परिसरातील भोजनगृहांमधील भोजनांच्या सुधारित दरांबाबत.**

विद्यापीठ परिसरातील सर्व विद्यार्थी, संशोधक, अधिकारी, कर्मचारी व संबंधितांना सूचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भोजनगृहांमध्ये उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या भोजनांच्या दरांमध्ये वाढत्या महागाईच्या प्रमाणात वेळोवेळी पुनरावलोकन करणे अपेक्षित होते. तथापी, कोविडोत्तर परिस्थिती, दुष्काळ व विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन विद्यापीठाने मागील चार वर्षे (सन २०२२ ते २०२६) भोजनाच्या दरांमध्ये कोणतीही वाढ न करता जुनेच दर कायम ठेवले होते.

मागील चार वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत अन्नधान्य, कडधान्ये, खाद्यतेल, दुग्धजन्य पदार्थ, व्यवसायिक एलपीजी गॅस आणि कामगारांचे वेतन यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. विद्यापीठ भोजनगृह चालकांकडून कोणतेही परवाना शुल्क, वीज किंवा पाणी शुल्क आकारत नाही. तथापी, सद्यस्थितीत वाढलेल्या महागाईमुळे जुन्या दरांमध्ये विद्यार्थ्यांना स्वच्छ, सकस व पोषक आहार देणे व्यवहार्य राहिलेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी तडजोड न होता अन्नाचा उच्च दर्जा टिकून राहावा, हा एकमेव उद्देशाने मा. व्यवस्थापन परिषदेने सविस्तर विचारविनिमय करून किमान सुधारित भोजन दर खालीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत.

| अ.क्र. | थाळी प्रकार | पूर्वीचे दर (वर्ष २०२२) | | सुधारित दर (वर्ष २०२६) | |
|---|---|---|---|---|---|
| | | मासिक सदस्यांकरिता दर (रु.) | इतर ग्राहकांसाठी दर (रु.) | मासिक सदस्यांकरिता दर (रु.) | इतर ग्राहकांसाठी दर (रु.) |
| ०१. | मर्यादित शाकाहारी थाळी (निश्चित प्रमाणातील पूर्ण भोजन थाळी) | ३८/- | ४७/- | रु. ४८/- | रु. ५७/- |
| ०२. | मर्यादित मिनी शाकाहारी थाळी (निश्चित प्रमाणातील लघू भोजन थाळी) | २८/- | ३५/- | रु. ३८/- | रु. ४५/- |

विद्यार्थ्यांना निरंतर सकस व दर्जेदार भोजन पुरवण्याच्या प्रशासकीय प्रयत्नांना सर्वांनी सहकार्य करावे.
(सदर सुधारित दर दि. ०१ ऑक्टोबर २०२६ पासून लागू राहतील.)

प्रभारी कुलसचिव
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

जावक क्र./ गृव्य /११७३/२०२६
दिनांक : १५/९/२०२६